# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक २१/२/२०२४ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक १६८ -** अमरावती स्थित मौजे रहाटगाव सर्व्हे क्र. ७/१ मधील १.३० हे. आर जागा कृषी वापर क्षेत्रातुन वगळून रहिवास वापर क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्रमांक १६८ -** उपरोक्त प्रशासकीय विषय शहर सुधार समिती अस्तित्वात नाही व त्याचे अंतिम अधिकार सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु सद्यस्थतीत सर्वसाधारण सभा व शहर सुधार समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास दिनांक २/११/२०२३ रोजी ठराव क्र. ११४ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. १९६६ चे कलम ३७ (१) नुसार सदर ठराव मंजुर केल्यावर नागरीकांच्या हरकती व सुचना बोलावण्याकरीता अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ११-१७/१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन सदर जाहिर सुचना वृत्तपत्र देशोन्नती व अपना महाविदर्भ अमरावती मध्ये दिनांक ४/१/२०२४ रोजी प्रसिध्द झाली आहे. विहित मुदतीत म्हणजेच महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्दच्या दिनांकापासुन एक महिन्याच्य आत कोणतीही हरकती व सुचना या कार्यालयास प्राप्त झाली नसल्याने कलम ३७(१) मधील तरतुदीनुसार सदर फेरबदल प्रस्ताव शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे.

मौजे रहाटगाव सर्व्हे क्र.७/१ मधील १.३० हे. आर जागा कृषी वापर क्षेत्रातुन वगळुन रहिवास वापर क्षेत्रात समाविष्ट करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास शहर सुधार समितीची अंतिम मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर प्रस्तावास मंजुरी प्रदान करावी. तसेच सदर प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याकरीता प्रशासनास परवानगी देण्यात यावी. सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि. २१/२/२०२४ ला मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय शहर सुधार समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा व विषय समित्या अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका, अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका, अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.